# बाभळीचे बन

प्रभाकर जोगळेकर



म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५८८

REFBK-0025822
REFBK-0025822

संदर्भ काव्य

२५८८
२५८२२
२५।२।८९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. २५८८
काव्य २५८२२
२५।२।८९
शाखा

# बाभळींचे बन

– कवि –

प्रभाकर जोगळेकर

REFBK-0025822

REFBK-0025822

निरंजन प्रकाशन

६७१ गुरुवार पेठ, पुणे ४११० ४२

प्रकाशक-

अरुण रामचंद्र एडके
निरंजन प्रकाशन,
६७१ गुरुवार पेठ, पुणे ४११ ०४२.

मुद्रक-

सौ. ता. पां. खेडेकर
मल्हार प्रिंटर्स
७०८, घोरपडे पेठ,
पुणे ४११ ०४२.

© प्रभाकर जोगळेकर

प्रथमावृत्ती : मार्च १९८८

मुखपृष्ठ
सुहास चांडक

मुखपृष्ठ छपाई
के. जोशी अ‍ॅन्ड कंपनी, पुणे.

मूल्य - ३० रुपये फक्त

## ऋणनिर्देश

माझा पहिला काव्यसंग्रह 'बाभळीचे बन' मूर्त स्वरुपात येण्यामागे ज्यांच्या प्रेरणा, ज्यांचे मार्गदर्शन, ज्यांचे सहाय्य ज्यांच्या सदिच्छा कारणीभूत आहेत त्या सर्वांच्या ऋणांचा निर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो. माझे प्राथमिक शिक्षक श्री. मा. प्र. कुलकर्णी यांनी अगदी लहान वयात माझ्या अंगचा काव्य गुण व सुप्त प्रतिभा ओळखून तिचा विकास घडवून आणला. कै. अनंत काणेकर यांनी कवितेचे तंत्र आणि मंत्र समजावून दिले. श्री. मंगेश पाडगावकर, कुसुमाग्रज, श्री. रेगे यांच्या काव्याची माझ्या मनावर विलक्षण मोहिनी पडली. श्री. प्रभाकरपंत बिडवे. श्री. दत्ता हलसगीकर, सौ. पद्मताई गोळे या माझ्या कवि मित्रांनी मला अचूक मार्गदर्शन केले. श्री. मुकुंद आगरकर या माझ्या रसिक मित्राने जवळजवळ प्रत्येक कवितेचे चोखंदळपणे परिक्षण करून त्यातील गुणदोष दाखवून दिले. माझे वरिष्ठ अधिकारी श्री. व्ही. टी. पवार व श्री. एम. एच. पुरवत यानीं मला सतत प्रोत्साहन दिले व माझे परमस्नेही श्री. कांबोज व श्री. कारभासे यांनी हा काव्यसंग्रह प्रकाशित करणे कामी सतत पाठपुरावा केला आणि माझे शालेय जीवनातील माझे अत्यंत घनिष्ठ मित्र श्री. दाभणे यांनी सर्व प्रकारचे तातडीचे सहाय्य करून सक्रियपणे आपला वाटा उचलला या सर्वांचा मी मनापासून ऋणी आहे.

29८ 24422 काव्य क्र. 23/2/८९

## अर्पण पत्रिका

नृत्यनाट्य संगीत साहित्य कला व क्रिडा
या क्षेत्रातील अव्वल दर्जाचे रसिक व
भारताच्या औद्योगिक क्षेत्रातील एक
अग्रगण्य व प्रगतशीलउद्योगपती

शेठ श्री. विनोद लालचंद दोशी यांना ....

# प्रस्तावना

बालचंदनगर येथून निवृत्त झालेले रसिक साहित्यिक श्रीयुत प्रभाकर जोगळेकर यांच्या निवडक कवितांचा ' बाभळीचे बन ' हा कविता संग्रह नव्यानेच वाचकांपुढे येत आहे. काव्यप्रांतातील एक सहकारी या नात्याने मी त्यांचे स्वागत करतो. अभिनंदन करतो.

८० पृष्ठांच्या या कविता संग्रहात विविध विषयांवरील कविता संग्रहीत केलेल्या आढळतात. त्यांच्यात काव्यगुणही वैपुल्याने आढळतात. आज मराठी कविता एका नव्या वळणावर उभी आहे. अशावेळी कवितेचा जन्म पुन्हा नव्याने तरारुन आलेल्या मळचासारखा फोफावलेला दिसतो. नवनवे काव्यसंग्रह प्रकाशित होत आहेत. नवनवे प्रवाह घेऊन आलेले काव्यसंग्रह प्रकाशित होत आहेत· नवनवे कवी आपल्या नवजाणिवांचा नजराणा, लहानमोठे तबक घेऊन स्वकरी शारदेपुढे उभे असलेले दिसतात. साहित्य समेलनात तर कवींची. अखंडित रांग उत्सुकतेने रंगमंचाबर येण्यात उत्सुक दिसते. अशा सुवेळी श्री. जोगळेकर हेही आपली कविता घेऊन आपल्यापुढे येत आहे ही एक आनंदाचीच घटना आहे

प्रस्तुत काव्यसंग्रहात प्रेमाविषयक निसर्ग – विषयक, सामाजिक विषतमा प्रगट करणाऱ्या, तसेच निर्मळ अत्यानंदी वृत्तीच्या, विविध स्वरूपाच्या कविता आढळतात.

श्री. जोगळेकर यांचे मन, खरे पहाता, आशावादी आहे. वैफल्याची चित्रे त्यांनी क्वचित रंगविली असली तरी त्यांची एकूण वृत्ती,

जुन्या विचारांनी दिली
नव्या विचारांना जागा,
काळोखाच्या कपाशीने
दिला प्रकाशाचा धागा !

अशीच बहरणाऱ्या जगाकडे एक नजर लावून बसली आहे असे वाटल्यावाचून रहात नाही.

जीवनावर प्रेम असल्यामुळे या कविता विश्वात ' प्रेमगीते ' बरीच आढळावी यात नवल नाही. विसर पडतो मला ही पहिलीच कविता मोठी लक्ष्यवेधी आहे. शृंगारमय असूनही तिने आपला संयमाचा पदर ढळू दिलेला नाही. हे विशेष ' प्रीतीचे लेणे ' (पृष्ठ २८), ' कारण याचे ' (पृ. १४), ' केळी ' (पृ. १५) याप्रमाणे ' मीच हवा ' (पृ. २१) ही कविताही वैशिष्टयपूर्ण वाटते. तिची रचनाशैली निराळया वळणाची व घाटदार आहे. ' हसायला हवं ' या कवितेमध खेळकर व प्रेमळ वातावरणाचा झुळझुळता वारा मन हलवून सोडतो. अशाच आणखी काही प्रणयधुंद कविता या संग्रहात आढळतात. त्यांत थोडे परिष्करण असते संस्करण असते, तर त्याचा डौल अधिक झोकदार दिसला असता !

श्री. जोगळेकर हे वृत्तीने कवी आहेत हे या संग्रहात ठायी ठायी जाणवते; त्यांचे काही कवितातील आशयाच्या अविष्काराचे सामर्थ्य खास उल्लेखनिय आहे. ‘आजच्या मराठी कवितेत’ याच नावाच्या कवितेंत (पृ. २०) कांही कांही भावोग्दार चटकदार आहेत. उदा.

अर्थशुन्य जगण्यापेक्षा – जीवनाचा नवा अर्थ
तिने प्राप्त करुन दिला आहे.........
आता तिच्या अंगावर दागिने आहेत. नवे
काही झाले तरी ती जातीचीच आहे सुंदर
तिला काहीही शोभते !

या संग्रहात काही कविता आजच्या ढोंगी, तकलादू, यांत्रिक, जीवनांशी संबंध व त्यां जीवनाचा उपहास करणाऱ्या अशाही आहेत.

पण असे असलें तरी ‘पूर्वज’ (पृ. ३१) सारखी कविता आपल्या मनाला एक निराळाच स्पर्श करून जागृत करुन जाते !

‘सूर लागे’ (पृ. १३) अशा सारख्या कवितेत कविला कवितेचा खरा सूर सापडला आहे असे निश्चित वाटते ! निर्मळ कवितेचा एक आरस्पानी नमुना म्हणून ही लक्षात राहते. ‘घडो माझा निवास’ (पृ. ३७) ही देखील अशीच एक विलोभनीय कविता आहे.

हा कवी जाता जाता कवितेतून एखादे हृद्य चिरंतन सत्य मधेच केव्हातरी सुचवून जातो. ‘एकता (पृ. ३५) ही कविता ‘प्रिय भारत’ ही कविता देखील खऱ्या रसिकाला मोहित करणारी व देशप्रेमोनी भरलेली आहे.

वरील सारख्या कबिता वाचल्यावर कविने कल्पना–चमकृतीच्या आहारी जाऊन लिहिलेल्या कविता ( त्यात काव्याची काही थोडी चमक असली तरी ) संग्रहातून बाजूला टाकल्या असल्या तरी चालले असते असे मात्र वाटते. ‘माहेर’ सारखी निरागस, भाव निर्भर, मनमोकळी कविता लिहिण्याच्या कविनेच यापुढे अंतर्मुख होऊन ‘चुटके’, ‘चमत्कृती’ व ‘क्षणिक भावकंपन’ यातुन पुढे सरकले पाहिजे. शेवटी सांगावयाचे म्हणजे ‘दुपारी’( पृ.७१ ) सारखी अधिकाधीक सुंदर, मुग्ध, शब्दांपलिकडचे काही सांगणारी कविता कविने यापुढे आम्हाला अधिक द्यावी . तो ती तशी देईल एवढा दिलासा हा संग्रह नक्कीच आपणाला देतो ! !

श्री. वि. म. कुलकर्णी

# पुरस्कार

श्री. प्रभाकर जोगळेकर यांचा 'बाभळीचेबन , हा कविता संग्रह वाचला-आणि जुन्या परिचिताची बऱ्याच दिवसांनी गाठभेट व्हावी, असा काहींसा अनुभव आला. कारण 'बाभळीचे बन ' संग्रहातील कवितेला चेहरा आहे . हा चेहरा माझ्या परिचयाचा आहे . ओळखीचा आहे. कवितेशी माझी प्रथम ओळख झाली तेव्हा-पासून मी तिला याच चेहऱ्यानं ओळखत आलो · पुढ पुढ ती जेव्हा केव्हा पाठय-पुस्तकातून, मासिक-पत्रातून किंवा संग्रहातून दिसली, भेटली तेंव्हा तेव्हा तिचा हा चेहरा होता. त्याही पुढ नंतर मी जेव्हा कवितेंशी सलगी करु लागलो, तेव्हा देखील सूरवातीला कित्येक दिवस ती अशाच वळणाच्या चेहऱ्यामोहऱ्यनं अवतरली होती. पुढ आणखी काही दिवस-मास उलटले, वर्षे लोटली. आणि कवितेनं चेहरा बदलायला सुरवात केलं.

अक्षर-मात्रा-वृत्ताची वृत्ती ती विसरु लागली आणि ती आखीव-रेखीव पण बांधीव चौकट मोडून ती मुक्त स्वच्छंद होऊ लागली. एखाद्या कोपऱ्यापर्यंत चोळी घालूनदेखील वर अंगभर पदर घेणाऱ्या घरंदाज गृहिणीनं स्लीवलेस पोलकं घालून वावरावं, तसं जुन्या वळनाच्या मंडळींना वाटू लागलं.

पण यातही फारसं बिघडल नव्हतं कारण या मुक्तपणातही तिला तिचा असा चेहरा होताच. मुक्तपणातही तिला तिचा असा बंध होताच. त्या नव्या रुपा-तही तिची ओळख पटत होतीच.

नंतर अलिकडं या विस पंचविस वर्षात मात्र कवितेचा चेहरा पार पार बदलून गेला आहे. इतका की तिची ओळख पटणंच कठीण झालेलं आहे.

जो आकार मनात येतो । मन घेते तोच आकार ।।  
जो विकार मनात येतो । मनाला होतो तोच विकार ।।  
जे रुप मनात येते । तेच मनाचे असते रुप ।।  
जो रंग मनात येतो । तेच मनाचे रंगरूप ।।

श्री जोगळेकरांनी रंगरूप गंधाचं आपल्या मानसिकतेशी असलेलं नातं 'मनाच्या मना' नामक कवितेत सांगूनच टाकलेलं आहे. त्यामुळे 'जे जसे सुचले ते तसे लिहिले'- असाच या बाभळीच्या मनाचा चेहेरामोहरा आहे.

बाभळीच्या बनात ज्या कविता भेटतात त्यात प्रीतीची भावना असणं स्वाभाविकच आहे, आणि या प्रीतीचा विविधरंगी अविष्कार प्रकार होणेही सहज आहे.

प्रातःकाळी पक्षी गात असताना व झाडं प्रार्थनेत चूर असताना !...

यावे फिरून वाटे । दोघे प्रभातकाळी ।।  
विसरुनी सर्व व्याप । एका खुल्या सकाळी ।।

अशी इच्छा रसिक मनाला झाली तर नवल कराल ? कारण अवतीभोवती सजलेला निसर्ग हा देखील प्रेमदिवानाच आहे. प्रीतीचाच अविष्कार आहे. म्हणून निसर्ग आणि प्रीती हातात गुंफून समरसलेली इथे आढळतात.

तृणांकुराची नवनव मखमल । नील नभातिल सायंतारा ।।
सहवासाने सखे तुझ्या ग । मनात त्यांना मिळे सहारा ।।
आसमंत चांदरात । रेशिम रेती वरती ।।
करात कर घालुनी । प्रणयगीत घोळती ।।
मळलेली पायवाट । तू येता हिरवळली ।।
नितळ निवळ गगन निळे । कापरा परीस दुपार जळे ।।
पान–कळी–फूल–पाकळी । हातात–हात गुंफून साखळी ।।

या ओळीमधून निसर्ग, प्रीतीची हळुवार भावना मनाला सुखवून जाते. 'बाभूळ बनाला' त्याची अशी एक चित्रसृष्टीही आहे.

गगन निळे नयनातिल झुकलेले । डोळ्यात भरे ये वयात आलिस भोळी
अंगात दाटते तंग तुझ्या चोळी । लोचनात आवाहन ।।
अधरांवर आमंत्रण । नव्या साडिच्या घडीपरी तू कोरी ।।

अशा प्रतिमा–उपमामधून ही चित्रसृष्टी उमलताना दिसते.

निसर्ग, प्रेम यांच्या जोडीलाच इथे आढळतो तो उपहास- उपरोध, बाभळीच्या पिवळ्या जर्द फुलांच्या झुरक्या बरोबर बोचरे टोचरे काटे असतातच ! या बाभूळ बनातही ते आहेतच ! माणसं धर्मांच्या गप्पा एरवी ठोकत असतात. परमार्थाची भाषा ऐसपैस पणानं करीत असतात, पण 'पुराणातला वाती पुराणातच रहातात आणि व्यवहार धर्म मात्र आचरणात आणत असतात. ' धर्म ' या कवितेत कवीनं याचं छान दर्शन घडवलं आहे.

रस्त्यावरून जाताना । बलिष्ठम् शरणम् गच्छामि; ।।
ऑफिस मधे असताना । वरिष्ठम् शरणम् गच्छामि ।।
आपल्या घरी असताना । कलत्रम् शरणम् गच्छामि !

पोटार्थी कारकुनी माणसाच्या भोवती फायलीचंच जग निर्माण झालेलं असतं आणि याच जगात तो पार बुडून जाऊन जगत असतो. हे जगही मोठं चमत्कारानं भरलेलं असतं. माणसाच्या मनाची आणि खटपटी लटपटींची अनेक रूपं या जगात अस्वस्थ असतात.

फायलीच्या जगात । सारे काही फाईल होते ।।
मंत्र्यांचे अपराध । उपमंत्र्यांचे प्रमाद ।।
साहेबांच्या चुका । पुढाऱ्यांच्या घोडचुका ।।

पण या फायलीचे कागद संभळण्यास कारकुनाच्या 'लहानशा चुकीला मात्र क्षमा नसते. कवी म्हणतो;

फायलीच्या जगात हे असेच चालायचे !......

'चालायचे' हा तर आजच्या परवलींचाच शब्द बनला आहे. खुशाल कायदे तोडा स्वैर-बेबंद करा नियम धाब्यावर बसवा, कमरेचे सोडून डोक्याला गुन्डाळा कोणी हटकणार नाही! डोळ्यांवर कातडे ओढून म्हणतील, 'चालायचेच!' हे कधी-संपणार? कुठंवर-चालणार? कवी सांगतो, 'कांम्पूटरला विचारा !'

रोज भडकणारे भाव । सतत वाढणारी बेकारी ।।
जाळपोळ दंगेधोपे । वाढले व्यसनी जुगारी ।।
अमानुष बलात्कार । किळसवाणा भ्रष्टाचार ।।
कधी संपणार हे सारं । कॉम्प्युटरला विचारा ।।

पण तो तरी काय सांगणार ? कारण 'फीड' करणारे मानव नावाचे अमानवी प्राणी आम्हीच ना !...

दुःख, चीड संताप- हा देखील आजच्या या अगतिक-असहाय्य माणसांच्या जगात वांझ-नपुंसक होऊन गेला आहे ! पूर्वदिव्य असणारी आजची पिढी, माणसे अशी हृतबल, निराश का झाली आहेत ?

स्वातंत्र्याच्या बेदीवरती । प्राणपणाने सैनिक आमुचे लढलें होतें ।।
मुसमुसणाऱ्या नसानसातून । देशभक्तीचे तप्त निखारे जळत होते ।।

मग तरी असे का व्हावे ? कवी म्हणतो :-

सर्वेच या पुण्याच्या त्यांच्या । पाप एक नक्की असावे, खरेच होते, ।।
कारण सांगू उघड कसे मी । स्वार्थी, ढोंगी, दुबळ्यांचे ते पूर्वज होते ।।

दाहक अशी ही सामाजिक जाणीवही बाभूळबनात आढळते.

परंतु बाभूळबनाची एकूण प्रकृती, निसर्ग आणि प्रीती यांच्यातच बुडून जाण्याची, रमून जाण्याची आहे. या रमण्यात तशी संकोचिकता पुष्कळच आहे. रचनेचा सैल घाटही कुठे कुठे खटकतो, नविन काही हाती लागल्याचे समाधान उत्सुक रसिकतेला फारच अल्पप्रमाणात मिळते,...या दृष्टीने बाभूळ बनाची वाढ आणखी व्हायला हवी होती. कवीच्या पुढच्या वाटचालीत ती होईल अशी आशा व शुभेच्छा व्यक्त करतो.

**श्री. राजा मंगळवेढेकर**

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र.
काव्य
शाखा

## विसर पडतो मला

पिवळ्याधमक बाभळीच्या फुलांचे
जिकडे तिकडे लगडले गुच्छ
सारे रंग तुच्छ त्याचेपुढे

गुलमोहर मोहरला फुलांनी डवरून
मनमोहक लाल धुके
सारे रंग फिके त्याचे पुढे...

पांढरीशुभ्र मोगरीची फुले
नवतारखी उगवली घरेवर
त्याची नाही सर कोणत्याही रंगात–

लाजताना तुझ्या गोऱ्या गालावर
लाल रंगाची छटा पाहाताना
खरंच सागतो तुला

पिवळी पिवळी बाभळ फुले
टपोर पांढरी मोगरीची फुले
लाल लाल गुलमोहर–

साऱ्याच रंगांचा विसर पडतो–
का कुणास ठाऊक ?

**पाच आणे**

रोजची ती भूक ओरडते रडून
पाच आणे आहेत माझ्या खिशामध्ये पडून

रात्री राउळात कीर्तनाची दाटी टाळ-मृदंगाचा ध्वनी जाई दूर
रंगवुनी सांगे बुवाची हातोटी भाविकांचे नयनी प्रेम रसपूर
अभिनयाची खाण सांगे सप्रमाण, त्याची सर्वांवरी ताण
नाही मला देणे होत पैसे माझ्याकडून
पाच आणे आहेत माझ्या खिशामध्ये पडून

आला थयथय नाचत वासुदेव धोतराचा काचा वरी शोभतसे टोप
मोराच्या पिसांचा सुंदर जडाव हासरी ती मुद्रा चंदनाचा लेप
मोरासारखी नाचतो विजेपरी लवतो हरिनाम घेतो
नाही त्याचे चीज होत काही माझ्याकडून
पाच आणे आहेत माझ्या खिशामध्ये पडून

पूरग्रस्तांसाठी कलावंत कोणी मनोरम करी नृत्य वेळाउनी
तालावरी कोणी छेडीते गाणी सप्तस्वर जाती काय वेडावुनी
मंत्रमुग्ध केले इंद्रधनु त्याचे संगीताचे झेले
पाठवयात गेलो नाही एकदाही चुकून
पाच आणे आहेत माझ्या खिशामध्ये पडून

जाहिरातीचा मजला डोलाने सजला चित्रामुळे शोभला मासिकांचा अंक
शोधबोध देई मनरंजन होई दुःख लया जाई
वाचन त्याचे होत नाही कधी माझ्याकडून
पाच आणे आहेत माझ्या खिशामध्ये पडून

दंशधूम काढचा पाच आण्यामध्ये तिसऱ्या वर्गी स्थान चित्रगृहामधे
दूर नेई स्वर्गात उर्वशीच्या दारात दृश्य नेई दूर मला पऱ्यांचा जगात

अनुभुती त्यांची राही यात दडून
पाच आणे आहेत माझ्या खिशामध्ये पडून

माझे पाच आणे किंमत त्यांची पहा वरील सर्व सुखे गळुनी रहा
जरी घालीन चारा पिला गोड धोड तरी म्हणे जन स्वार्थी हा पहा
मायेमध्ये गुंग संसारी दंग नाही दुजे अंग
कलेसाठी कला आहे खोटे कशावाचून
पाच आणे आहेत माझ्या खिशामध्ये पडून

## दाट तमातुनी

उभ्या जीवनाचा वेध
काळ घेऊ पाहातो आहे
दाट तमातुनी आज
भानू तेजाळतो आहे.

अंधारल्या मनोवेल
फुटे आशेचें ते पान
गंजलेल्या मनालाही
जाई उजळून मौन

जुन्या विचारांनी दिली
नव्या विचारांना जागा
काळोखाच्या कपाशीने
दिला प्रकाशचा धागा

चारचौघात जनात
आम्ही उत्साह पेरिला

दारिद्र्याच्या घराखाली
एक सुरुंग लाविला
छिन्नभिन्न हो त्याचे
पहा झाले कलेवर
उदयोगास झाले आता
पहा मोकळे वावर

जाळे उदयोगाचे आता
विणायचे देशभर
प्रयत्नाने समृध्दीचे
गाठावयाचें शिखर
उभ्या जीवनाचा वेध
काळ घेऊ पाहातो आहे
दाट तमातुनी आज
भानू तेजाळत आहे

## आज कळाले

आज कळाले
रंग असावा प्रेमाला
श्वास असे कलिकेला

कल्पनेस फुटती पंख
नजरेला तीव्र डंख
जेव्हा मी लावियला

सखये तव प्रतिमेला
ओठभाग प्रेमाने
पान चावल्या रंगाने

## निराशेचा शिमगा

चैत्र पालवीसारखी
नुकतीच तू फुटली होतीस
डोकावत होतें लावण्य पदराच्या आडून
एकटेपणाच्या वैशाख- वणव्यात
होरपळणाऱ्या मला
अगदीच अचानक झाले तुझे दर्शन

तू दिसताच श्रावणाची सर
अंगावर पडल्याचा
एक गोड हृदयस्पर्शी भास झाला.

तू नजरेच्या आड होताच
आठवणीच्या कवडशांची
माझ्या मनात रांगोळी घातली
भाद्रपदातल्या पत्रीसारखा
तुझा- माझा पत्रव्यवहार वाढला

आश्विनातल्या पिवळधमक
फुलासारखा लग्नाचा स्वप्नदिवस
केव्हा होतो असे झाले होते मला.

एकदा पुन्हा आलीस भेटलीस
कार्तिकातले धुसर चांदणे
भेट देऊन गेलीस

माघातल्या कडक थंडीसारखा
तुझा विरह मला झोंबत होता.
आणि सिंहस्थात मुहूर्त नाहीत
असे कळाले तेव्हा
निराशेचा शिमगा मनसोक्त बोंबलला
" तुझ्या नशिबांत ती नाही "

## पडे चांदणें पिठासारखें

अभिमाने प्रेमभरे ऊर भरे धरतीचा
दरवळल्या गंधाने श्वास हंसे वाऱ्याचा

स्पर्शाचे सुख लुटती किरणांचे कर अनंत
जललहरी नाचतात नच घेती क्षण उसंत

आकाशही परकेंपण विसरुनी क्षण गेलें
अरुणोदय होताना फुल कळीचे झाले

जन्म फुलांचा असतो सुखवाया जगताला
फुल पाहुनी हर्ष न हो तो मुकला हृदयाला

पान कळी फुल तृण झाड झुडूप वेली
सूर्य चंद्र नभ तारे नक्षत्रे कुणी केली

रे तुझ्या सौख्यास्तव हे सारे विश्व फिरे
सुख त्याचें घे लुटूनी तव हृदयी तेच स्फुरे

विस्फारून का बघशी पानगळीतील पाने
नव्या पालवीसाठी जागा देती आनंदाने

तुजसाठी त्यागाचे पुन्हा नव्या निर्मितीचे
चक्र पहा फिरत असे तुजसाठी नियतीचे

पान मोकळे हात एकदा फुलत्या फुलासारखे
तुझ्यासाठी या शरदाचे पडे चांदणे पिठासारखे

## नाटकांत

ही वाट नागमोडी
जाते वळून दूर
झाडे उभी दुतर्फा
जी प्रार्थनेत चूर

यावे फिरून वाटे
दोघे प्रभात काळी
विसरुनी सर्व व्याप
एका खुळचा सकाळी

गाई सुरेख गाणी
फांदीवरील पक्षी
रांगोळी काढी चाफा
शोभे धुळीत नक्षी

पानासवे फुलांची
ऐकूनी या बातचीत
घेऊन का न आला
संगे तुम्ही ती प्रित

ऐकून हा गुलाबी
शेश कळचा फुलांचा
केसात मी तुझ्या ग
माळी तुरा फुलांचा

गाशील ना गाणे
गालात हासुनिया
येशील ना तू वेगे
माझ्या मिठीत ग या

म्हणतेस काय असले
हे सर्व नाटकात
अजुनी उभेच येथे
दोघेही फाटकात

## जागा सापडेल

क्षुद्र वृत्तीचे मीनार, जरी ठाकले अपार
झोपडीत कोठेतरी आपुलकी दिसेल
जागा सापडेल.

आल्या-गेल्याचे स्वागत कोण करील घरात
रामराम करोनी खाली घोंगडी टाकेल
जागा सापडेल.

वारा वाहेल प्रशांत. ज्योत तेवेल खुशीत
मीठभाकरीचे घास पोटभर मिळतील
जागा सापडेल.

पाही त्यांच्या हृदयात, मानव्याची दिव्य ज्योत
तिच्या प्रकाशात तुला मार्ग पुढचा दिसेल.
जागा सापडेल.

देशसेवा तुझे व्रत तुला सर्व ती मदत
लाख कर क्षणामधे, तुझ्या करी जुळतील
जागा सापडेल.

## गगन निळे नयनातिल

गगन निळे नयनातिल झुकलेले
पदि पैंजण वाऱ्यापरी नाचुनिया थकलेले
घामाने वर्षेपरी अंगअंग चिंब कसे भिजलेले
अग्नीपरि दीप्त मदन वणवे ते भडकुनि क्षण विझलेले
पृथ्वीपरि शरीर तुझे जड होउन भरलेले

जमलेले भोवती तव स्वार्थाने सडलेले
बाजूला एक खरी ती आई पान एक पिकलेले
पानाच्या आड तुझी एक कळी उमलावी
स्वप्न जिच्या अंतरात केव्हाचे दडलेले
सुखदुःखाच्या सगळ्या माऱ्यातुन जपलेले

सांग तिला तव हृद्‌गत जे कांही चुकलेले
तीच तुला मार्ग अचुक दाखविल कोण कसे फसलेले
तुजसाठी प्राण तिचे अडलेले ना तरि मागेच तिचे
गगन निळे नयनातिल झुकलेले
ग ग ना ला मिळण्यास्तव टपलेले

## मित्रा

मित्रा तुझा सहवास गुलाबपुष्पाचा
संगतिचा गंध मधू दरवळतो नित्याचा

मित्रा तुझा सहवास वाळूतला निर्झर
रुक्ष माझ्या जीवनी तू मायेचा पाझर

मित्रा तुझा सहवास शरदाचे चांदणे
स्नेहचंद्राची कळा वाढो हेच माझे मागणे

## मला वाटते

खोल खोल या मातीखाली
गाडुन घ्यावे जावे दडपुन
आणि उठावे पुन्हा तरारून
चैतन्याचा अंकुर होउन

अथवा वाटे सडुनी जावे
सडतो द्राक्षे ज्यापरि सुंदर
मधुरस होउन वरती यावे
द्यावी स्फुर्ती सकला भरपुर

कोंडुन घ्यावे इंजिनमधल्या
वाफेसम कधी वाटते
ओढुन न्यावी दरिद्रता ही
फेकुन द्यावी फार जाचते

## एकटाच एकांती

निळचा जांभळचा फिक्कट काळचा
लालभडक नारिंगी पिवळचा

मावळतीच्या रंगसंगती
भाव निर्मीतित नयनामधले

संध्येच्या साकारती
पाहातात जन हे सगळे

पण मी बघतो आळसले
तव नयनी भाव तेच रंग
एकटाच एकांती

## मनाच्या मना

जो आकार मनात येतो
मन घेते तोच आकार

जो विकर मनात येतो
मनाला होतो तोच विकार

जे रूप मनात येथे
तेच मनाचे असते रूप

जो रंग मनात येतो
तेच मनाचे रंगरुप

जो मनात असतो सुवास
तोच मनाला सुगंध

मनात असते जी चव
त्याच चवीने मन अंध

असे मन दिले तू देवा
तुझ्या मनात असेल तर

तुझे माझे मन देवा
एकच होईल खरोखर

तेव्हा हे मनाच्या मना
पूर्ण माझी करी कामना.

## ट्रिपलचा डोस

कळत–नकळत वेढुन गेलो
तिच्या डोळ्यात असताना उभा
आकाशाला वेढतात ढग. आषाढात जसे
वाटेल उभा राहूच नये जावे झोपी
साय ओढून जाते झोपी दूध जसें.

कळत–नकळत ओढला गेलो
तिच्या बहरधुंद फांदीकडे
हात लावताच डहाळीला .... मनात
प्राजक्ताच्या फुलांची पडली रास
अंगणात– संध्येच्या रंगाची
नयनरम्य धूळ उडाली – आणि
किती बरे वाटले रंगामुळे– फुलामुळे
तिच्यामुळें किती बरे तिहेरी बरे

हा ट्रिपलचा डोस घेतल्यापासून
मन कसं दुरुस्त कसं मस्त
अन् किती बिनधास्त

## आला आषाढ महिना

आला आषाढ महिना
आले अंधारुनी नभी
झड पावसाची लागे
झाडे भिजतात उभी

झाड माझे आहे उभे
कोसळते महागाई
भोवताली गरजांचा
सारा चिखलच होई

ऊन दुर्मिळ दुर्मिळ
मिळकतीचे या वेळी
देणेकरी झोंबे वारा
बसविता दातखिळी

मदतीला येई कोण
रस्ता आहे निसरडा
पावसात ओरडून
घसा पडला कोरडा

## सूर लागे

सरीवरी सरी येती ऊन येते मजेला
तरुवरि तृणपाती ये नवा तो तजेला
सळसळसळ पानी तालिया घुंगरांच्या
खळखळखळ बाजे लेजिमा त्या झऱ्यांचा
किलबिल होता ताल वाऱ्यांसह आला
चलविचल मनाची तार छेडून गेला
सरगम सरितेची रंगताती किनारी
मरगळ हृदयींची जाई संपून सारी
स्वरसुख फुलुनी ये श्रावणाचे उरात
स्थीरचर अवघ्याचा सूर लागे सुरात

## कारण यांचे

आज निराखिली असनी सुंदर
शुक्रचांदणी अंबरातील
आज पाहिली असली सुंदर
नृत्यसाधने माडामधली

मन रंगेना स्वरलहरीवर
आज गमेना स्वैर भटकणे
पाय वळेना त्या रस्त्यावर
नित्य जिथे मम येणे जाणे

आज टोचते उरात काही
स्तब्ध शांतता कसली नीरव
काय एकची कारण याचे
हातात नाही हात सखे तव

## चष्मा

तेच लोक तेच काम
तीच तीच हालचाल
तेंच प्रश्न रोजचेच
तीच रोज वाटचाल
दिवसरात्र पळत असे
पण कसला बदल असे
पळते परि बदलुनिया
चष्मा हा चष्मा

## तेंव्हा नि आता

काळजात घेतली लागण करुन गोरी पेर दंडाची
तोडुन घेतलीं साखरी जाभळं दोन काळचा डोळचांची
वेचून घेतले पान मोकळे हसताना ते मोती
अलगद आले छातीवरले बुजरे ससे हाती
मिठीत घेतला हो हात चांदण्याचा देह
बुडून गेलो खोल तळात प्रीतीचा हा डोह

काळजात बसले घर करुन पांढरे वाळके दंड
डॉक्टरची बिल भरताना झाले कर्ज उदंड
तोडते मनात पाहताना तुझे खोल खोल डोळे
कधी भयानक हसताना तू पोटात उठती गोळे
ससे पळाल सपाट छाती मिठीत घेता तुला
काठीभोवती लपटलेला फडका पोळला मला

## केळी

वाटलेच होतें मजला
काही न तुला वाटले
वाटले जरी काहीसे
कंठी न तुझ्या दाटेल
कंठात प्रेम दाटाया
जातांना निरोप वेळी
अस्तित्व ठेवूनी मागे
मी होऊ न शकले केळी

## गाडिवाना

धुळीच्या सागरात
हाकारल्या होड्या
उसाच्या गाड्या जागोजाग
गाडिवान सारे
बनतात नावाडी
संगतीला आवडी मागोमाग
साखरकारखाना
बनतो एक गोदी
देशामध्ये आबादी शिगोशीग
तृप्तीचे लवावे
भाग्याचे आकाश
सौख्यतेचा प्रकार जागोजाग
गाडीवाना तुझी
फिरतात चाके
विरे दारिद्रय धुके वेगोवेग

## पडते

डोके चढले नाक धार
आवाज बदले अरुची फार
कपाळ दाबुन दे आलिंगन
मिठीत घेऊन रसाळ चुंबन
कसले औषध हे पडशावर ?
या प्रश्नाचे साधे उत्तर
पडसे कसले काय मजा
आजच व्हाले सरली रजा

## घडो माझा निवास

उभविलेंस घरकुल, दोन चिमण्या पाखरांचे
नटविलेस नील नभ, छत देऊनी चांदण्याचें
नव नव्या पालवीने, मोहरती तरूवर
शीत छाया भुवरी, मऊ तृणाचा पसर.

मोकळेच वावर, अनिल खेळे मोकळा
डुले पिकांचे शिवार, बाजे शेंगाचा खुळखुळा
खळखळा तीर वाहे, तीर नदीचे नादते
रुणझुण गोपाळांचें, अंतरंग नाचतें

वाजवती गोड वेणू गोंजारून वासरा
कुजबुजती पांखरे, चोच देती लेकरां
पांखरे ही वासरे ही थोड गोपाळ नाजरे
आणि इथे झोपडीत, बाळ हांसे गोजिरें.

थकलेले विसावती, गोड यांचा सहवास
सदा यांच्या सांगती, घडो माझा निवात

## झोप

झोपेतच असता असता
मज जाग अचानक आली
बाहेर घराच्या पडलो
मी पहात झाडे वेली

गर्दीची चादर मोठी
फेकून कुठे ती दूर

झोपेतच होता चूर
तो वेडा उघडा रस्ता
झोपेतच होता चूर

झोपेतच होते अजुनी
तें खांब विजेचे सारे
माथ्यावर होते त्यांच्या
उतरले नभातील तारे

मांडीवर निःशब्दाच्या
पेंगुळला होता वारा
त्या नीरव शांत जलावर
शुक्राचा निजला तारा

आकाशही होते लवले
त्या सुप्त क्षितीजा वरती
निद्रेच्या अधीन सारें
तृप्तीच्या वस्त्रावरती

निद्रेच्या लाटेवरती
मी सहज फेकला गेलो
अन् मलाच नकळत केव्हा
परतून घरी मी आलो.

## समाधी

स्मरणे तुझे होताच गळाला
अभिमानाचा भव्य पिसारा
आम्ही मिळविले स्वराज्य कसले ?
गर्व आमुचा वृथाच सारा
तुला वगळता

मंत्र तुझ्या जयहिंद घोषाला
या रस्त्यातून या चौकातून
कोटि कोटि या कंठामधुनी
सभेतूनी अन् मेळाव्यातून
साचे बंदपणे

तव शौर्याची रचिली गाणी
गात निघालो तालावरती
समरगीत गाऊन दौडलो
शिस्तीने ओळीत प्रभाती
अंधपणाने

नाव तुझे चौकोना देऊन
उभारले तव पुतळे येथे
मख्खपणाने

तुझ्या कृतीची नाही केली
कधी आठवण साधी
शौर्याची तत्र फक्त बांधली
सुदंर एक समाधी
पंरपरेंने,

(२०)

## आजच्या मराठी कवितेत

आजच्या मराठी कवितेत
देऊळ दिसत नसले तरी
देवळांत जाणाराची दांभिकता
तिच्या दर्पासह उघडी पाडली आहे
आजच्या मराठी कवितेत

देव दिसत नसला तरी
देवांच्या नावांवर जगणारी
सैतानाची जयलाद
तिनें उघडपणे आणली आहे उजेडात
आजच्या मराठी कवितेत

निसर्ग दिसत नसला तरी
नैसर्गिक वासनेचा उघड उच्चार
तिने उच्च रवाने केला आहे
आजच्या मराठी कवितेत

आत्मा नसला तरी
आत्म प्रत्ययाची प्रत्यंशा ओढून
तिने दोनांवर तीव्र बाण सोडले आहेत,
आजच्या मराठी कवितेत

मुग्ध शृंगार नसला तरी
वास्तव्याच्या अंगारात जळून
शुद्ध झालेले प्रीतीचे
बावनकाशी सोने
तिने केव्हाच अंगावर शृंगारले आहे
आजच्या मराठी कवितेत

कळण्यासारखे काही नसले तरी
अर्थशून्य जगण्यापेक्षा–जीवनाला नवा अर्थ
तिने प्राप्त करून दिला आहे
यमक पास अलंकार नसले तरी

तोच दीपपणाचा अलंकार तिनें केव्हाच
उतरविला आहे
आता तिच्या अंगावर दागिने आहेत नवे
काही झाले तरी-ती जातीचीच आहे सुन्दर
तिला काहीही शोभते

## मीच हवा

मोहरला मोहरला आम्रतरू मोहरला
दरवळला दरवळला आसमंत दरवळला

अर्पियला अर्पियला शिवचरणी नवमोहर
युवतीने युवतीने ये बहरा गुलमोहर

यौवन ते यौवन पहिल्यांदा ये बहरून
सुन्दरता सुन्दरता मनमोहक झंकारत

झंकारत झंकारत नूपूरपदी नखऱ्याने
वेळावत वेळावत मान जरा झटक्याने

नम्रपणे नम्रपणे जोडून कर दोन उभी
स्निग्धपणे स्निग्धपणे चांदणिवळ नील नभी

चांदणिला चांदणिला जोडिदार चंद्र हवा
कळले मग कळले मग नच दुसरा मीच हवा.

## हसायला हव

फुलानी असाव फुलासारखं
हसून कराव स्वागत
मुलांनी असावं मुलासारखं
गोष्टी ऐकत खेळत
मांजरांनीं असाव मांजरासारखं
डोळे मिटून दूध पीत
तूच कशी चालतेस तिरपी तिरपीं
दोन्ही खांदे उडवीत
तशी तू आहेस फुलासारखी
पाकळी पाकळी फुललेखी
तशी तू आहेस मुलासारखी
गोष्टी ऐकण्यास आतुरलेली
तशी तू आहेत मांजरासारखी
डोळे मिटून टपलेली
जवळ येताच कशी कोण जाणे
तू असतेस बावरलेली
खर म्हणजे संसारात आता
तुला आता रूळायला हवं
फुलाशी मुलाशीं मांजराशी
जमवून घ्यायला हवं
पाणी घालाव खेळवावं
बशीत थोड दूध घ्यायला हवं
मी येताच बाहेरून दारात
उमलत्या चेहऱ्याने हसायला हवं

## फारच वाईट

फारच वाईट तुरुंग काळा
विचसर काळे काळे कैदी
शिक्षा काळी त्याहून काळा
जेलर बसतो खुशाल ऐदी

मनात काळं दुष्ट कबूतर
पंख वासना पसरून बसले
फडफड त्याची फारच वाईट
पाहून जीवन भेसूर हंसले

पूरही वाईट वाईट घुबडे
वाईट अपघाताची मरणे
वाईट त्यांचे भेसूर जबडे
वाईट त्यांच्यामधे राहाणे

सर्पही वाईट वाईट तू वृश्चिक
वीज दृष्ट काय ती कोसळे
नियमही असशी वाईट लवचिक
मोडून दुष्टा वाट मिळे

सर्वही वाईट साहिन मी पण
मानभंग तो त्याहून दारुण

## सृजनाचस डंख

जोवरी सूर्य हा प्रकाश फेकीत आहे
अन् वहात राही चोहिकडे हा वारा

जोवरी चंद्र हा परत पाठवी प्रकाश
अन् तेज सांडती अगणित या तारा

ग्रह तारे सारे कक्षेत जोवरी फिरती
फिरते ही धरती स्वतःभोवती नित्य

घालते सुनिश्चित फेऱ्या ती रविला
अस्तित्व तोवरी आहे मानवा सत्य

तोवरी माणसा निसर्ग सुंदर धरती
बरसती न्हाले नेसते तृणाची साडी

हरसाल नवी ती वेधुन घेई चित्ता
माहेरी न्याया चंद्र पाठवी हरिणांची गाडी

हरिणांची गाडी अजून चाले काळ लोटला किती ?
धरतीवर गाडी आलीच नाही येईल का ती कधी ?

संपणार नाही कधीच कां त्या गाडीची वाट
कळे न कोणा प्रवासात या लागेल किती अवधी

तोवरी मानवा नित्य कल्पना सुचती
कल्पनेस फुटती कुठे कसेही पंख

साऱ्याच मानवा तिने मारला आहे
एक अनोखा आवडीचा सृजनाचा डंख

## गुलाबी सुस्ती

असाच पडतो मी तर पेंगत
प्रसन्न ताज्या प्रभात काळी
जाग्या स्वप्नामधेच रंगत
मऊ रंगाच्या अंगाखाली

या आळश्याच्या अंगावरती
तिच्या हातातून चादर पडते
फरफरलेल्या ज्वालेवरती
दोन कपाचे पाणी पडतें

बशा कपातून झरते संगीत
कमल मुखातून फूंकर पळते
" इश्य ! उठाना घ्या हे अमृत "
लाडिकवाणी मज आळविते

चहा दुधाची अवीट संगत
दोन जिवाची प्रीत फुलविते
मधुराणीशी बोलत बोलत
पहा गुलाबी सुस्ती उडते

ग्रंथालय ठाणे
२४२२ २४२२२ २४१४८
काव्य
शाखा (स्थळ प्रत)

## मोरुचे स्वप्न

घरभर पसरलेली लहान लहान मुलं
परसभर झालेला उष्टचा पत्रावळी
मुलूखभर आलेला सर्वांना आळस
चालूच होत्या तरी अजून जेवणावळी.
भजी पापड बुंदी सारे काही सुग्रास
त्यात मिसळन गेले उदबत्यांचे सुवास

पानाच्या तबकातील चुन्याचे द्रोण
काताची बोटे लावून जखमी झाले
कातरलेल्या सुपारीत गुप्तपणे बेटे
तंबाखूचे घातपाती मिसळून गेले
मावळू लागल्या वत्या अंधार लागे पडू
खाल्लेल्याचा कैफ आता लागला होता चढू

हंसण्याची खसखस मांडवभर पिकली
जागा सांपडेल तिथे पचापच थुंकली
धुक्यासारख्या जांभया पसरल्या दाट
त्यांत बुडून गेली आळसलेली पहाट
आता सारे सारे लागले पहा घोरु
फक्त नवरी जागी आणि तिचा मोरु

मोरू म्हणे तिला सारें झोपेंत मग्न
आतां आपण खरे करुन टाकू लग्न
मिळणार नाही पुन्हां एकात कधी असा
तुझ्या मऊ तृणमिठीत मी गुलजार ससा ॥
गालातच्या पट्टीसारखा मोरू तिला चिकटला
ठणकणाऱ्या वेदनेचा भर तेव्हां ओसरला

खरे म्हणजे मोरुचे लग्न झाले नव्हतें
लग्नाचे स्वप्न मात्र भग्न झाले होते
मोरू ड्रेसर गॅंलासची पट्टी हाती घेई
इऱ्यासारखी नितळ नर्स तिच्या हाती घेई
तिला पाहून मोरूला स्वप्न पडे लग्नाचे
स्वप्नामधे वरील सारे आलेले असायचे

## सी. आय. डी. गर्ल

लांब असावा इतका
की, झाकून जाईल शरीर
आखूड असावा इतका
की, वेधून घेईन तुमची नजर
यालाच म्हणतात कुणी स्कर्ट

हाक मारली तर
सहज ऐकून येईल
पण पहावे म्हटले तर
दिसणार नाही परत जाईल
यालाच मोक्याची जागा

आपण ज्याला पहाणार
तो तर दिसावा आपणाला
पण दिसू नये त्याला
पाहाते कोण आपल्याला
याला म्हणाव गॉगल

अशी स्कर्टवाली
गॉगल घालून
मोक्याच्या जागी बसली होती
यापेक्षा कवीला काय कळणार ?
ती सी. आय. डी. गर्ल होती

## प्रीतीचे लेणे

उधळलेस तू वाऱ्यांवरती तुझे सुगंधी हेतू
कानात ठेवूनी फुल एक फायाचे
मलाच नकळत जेव्हा कंठाच्या घरटयातून
गगनात धावले स्वैर स्वरांचे पक्षी......

सरले अंतर दोघांमधले कुणा न कळले
सुरांस आणि सुगंधास त्या कसे कळावे !
अस्तित्व तयांचे नसे वेगळे, तारूण्यातील
दोन जिवांच्या उत्कट अधिऱ्या भेटीवाचून

सूर सुगंधासेवे मिळाले घेता तुला
तुला न कळले मला ना कळे वेळ किती संपला
तुझे सुगंधी श्वास तृप्त अन् सुरेल ते बोलणे
स्वर्ग पाहुनी नसे वेगळा हे प्रीतीचे लेणे.

## कशासाठी सारे

झाकावया देह
निर्मिलीस वस्त्रे
वस्त्रासाठी देह
करीशी अनावृत

श्रमविन्यास भूक
पिकविलेस अन्न
अन्नासाठी कां तू
उपास प्रवृत्त

शांततेसाठी
तुवा युध्द केले
युध्दासाठी आता
शांततेचे मंत्र

कशासाठी सारे केले
मानवा तूं केले
नाही ईश्वराचे
जयामागे सूत्र !

## ती प्रीत

ती प्रीत अचानक अनुभवली
धुंद मनाने चंद्र नभीचा पाहत पेंगत
रम्य चांदणे मंद स्मिताने अधरा उजळत
असतां रात्री नदी किनारी मिठीत रंगत
अधरावरली अमृत कणिका संपविली

ती प्रीत अचानक अवघडली
खिन्न मनाने कष्टवेदना सोसत क्रंदत
अमित यातना साहुन भोगुन अखेर गांठत
मरणालाही मिठी मारूनी जन्मा घालत
जीवनातली कठीण समस्या सोडविली

ती प्रीत अचानक अभिनयली
रंगभुमीवर या विश्वाच्या नानारुपे
नयनमनोहर या संसारी आशारुपे
जीवनसंगरी सुख दुःखाच्या नाना व्यापे
अतृप्तीतुनी अमरदाला अनुसरली

## पॅकबंद

बाई फार नाजुक
मुलं झाली बारा
बुवा पण नाजुक
सिंगल पितो तेरा

असं कळल्यावरती
एक शोधक उपटला
संतीतीच्या बंदिसाठी……
उपाय त्याला सुचला

घराघरातून सुरूवात
केला चहा बंद
पुन्हा एकच वर्षात
झाले पॅकबंद

काहीतरी ऐकले
केले काहीतरी
कसा सुटावा प्रश्न
चुकीच्या मार्गाने

## काचेच्या घरात

ज्वालेची फुल वेचण्याचा छंद
कशाला लावून घेतलास अरे !
तुझे कापराचे कुशल हात
नकळत जाळून घेतलेस की रे

स्वेदाच्या गंगेत पोहण्याची हुक्की
कुठून झाली तुला रे आज !
पाहिल्यास फेरीत भरलीसे छाती
ती पण दाखवायची वाटते लाज

नजरेचा तीर मारण्याचे धाडस
कशाला उगीच तू केलेस !
शिकार अवजड पाठीवर घेऊन
पाठीचे सुंदर धिरडे केलेस

आता निदान एवढं तरी कर
जिवाला लावून घेऊ नकोस
काचेच्या घरात आहेस तोवर
दुसऱ्यांना खडे मारू नकोस

## पूर्वज

स्वातंत्र्याच्या वेदीवरती
प्राणपणाने सैनिक आमुचे लढले होते
मुसमुसणाऱ्या नसानसातून
देशभक्तीचे तप्त निखारे जळले होते
या भुमीतव बलिदानाचे
पुण्य तयांच्या पदरी निश्चित पडले होते.
शेळीपरी मरण्याचे धाडस केले होते.
शेळीपरी जगण्याचे सोडून
वाघापरी मरण्याचे धाडस केले होते.
या मातीशी एक आगळचा
भव्य दिव्य प्रेमाचे नाते जडले होते

लढता लढता धारातीर्थी
या मातीच्या चिंतनात कर जुळले होते
सर्वेच या पुण्याच्या त्यांच्या
पाप एक नक्कीच असावे खरेच होते.
कारण सांगू उघड कसं मी
स्वार्थी ढोंगी दुबळ्याचे ते पूर्वज होते.

## विसरा

नयन मनोहर
सळसळ पातळ
कुरळ तरळती
बटा शोभे कपाळ

नटखट नखरा
सुख दुखः विसरा
विसरू नका पण !
रुपये खण खण

लुटूनी घे मजला
त्या आधी कर खाली

खिसा तुझा सगळा
हीच आजची बोली

जाईल वेळ वाया
माझी रसरली काया

विस्मृतीत संसारा
दे फेकून हो मुक्त

## कृपादृष्टी

नजरेंत तुझ्या मी त्या
जेंव्हा भिजून गेलो

मातीत गाडलेलो
मी अंकुरात आलो

अल्पावधीत मजला
फुटली सुरेख पाने

पानातूनी कळचा त्या
डोकावल्या सुखाने

हल्केच त्या कळचांची
झाली फुले टपोरी

येंणार ती फळाला
किती वाटते हुशारीं

कांढू नकोस आता
माझ्यावरूनी दृष्टी

करी रे तुझ्या कृपेची
बहुमोल तूच दृष्टी

जर वाटते तुला मी
यावे फळा फुलाला

तरी तू नकोस खंडू
तव वहात्या जळाला

## जातियता

महिला ललना म्हणता म्हणता
त्या यादीतच वामा म्हणती

आदिशक्ती हे अबला गणती
डाव्या बाजूस बळे बसविती

नाव कुठेही यांचे पहिले
जिचें तिथे दुढ्ढाचारी

सर्व हक्क स्वाधीन केले
पडता खाली कोण सावरी

आवड त्यांची तसे वागणे
नियम करूनी तेच मोडिती

पडद्यावरती आम्ही नाचणे
कला साधना नसे अनिती

संतती यांची वैभवयाचे
सगळा यांचा बोलबाला

समान म्हणती हक्क स्त्रियांचे
हक्क जाऊनी हात पकडला

म्हणोत कोणी निसर्गकिमया
परधीनता महिलांची

पहा कशी झुकते दुनिया
जातियता ही पुरुषांची

## एकता

नाहीच विसरलो मी पण माझे
दुराभिमानी मी गांवाचा
प्रांतियतेचे वागवी ओझे
आणि लाडका मी जातीचा

या भावाना उरां ठेवुन
मला वाटते विराट व्हावे
पाय ठेवूनी पृथ्वीवरती
स्वर्गाच्या बागेत फिरावे

रंग ठेवूनी माझा कायम
मला वाटतें व्हावे पाणी
आणि नटावे त्या रंगासम
ज्या रंगाची असेल दाणी

नदी पणाला कायम ठेवुन
सागरास मिळेल का सरिता !
अनेकतेची झाडे लावून
कशी फुलावी इथे एकता

## कोडे

कळते पण वळत नाही
हे का मज कळत नाही
पण प्रीती जनरीती
एक दुजा येत आड
कोडे कधी सुटेल
सांग सख्या तू मजला

## देणे

मोहरून गेले होतें मी उत्सुक रात्री पहिल्या
बावरून गेले होते मी अधिऱ्या रात्री पहिल्या
वाटले स्पर्श होताच देहावर फुटतील काटे
फुलतील फुलें स्पर्शांची श्वासातून सुगंध दाटे
मग मिठीत घेशील मजला ती अपूर्व उत्कृष्ट भेट
त्यासाठी मिलन रात्रीं मी पहात बसले वाट
मी पीस तुझ्या स्पर्शांचे फिरवीन तनूवर साऱ्या
मी परीस तव स्पर्शांचा लावीन तनुला साऱ्या
दुर्दैव असे पण माझे तू रात्री नाहीस आला
वाटले मला आलास तो भासच केवळ ठरला
येशील तू स्वप्नी स्वप्नात वाटले नव्हते
प्रत्यक्ष तू न येणार स्वप्नात वाटले नव्हते
काही पण कारण असू दे रात्री न तुझ्या येण्याचे
पुरुषांची हृदये असती कोरीव दगड लेण्याचें
मानतो अशा दगडाना आम्ही सौभाग्याचे लेणे
जणू सात जन्मीचे त्यांच्या लागतो आम्ही ते देणे

## चारुदत्तालाच

सुखात असावे नाटक तीन अंकी
योजनागंधा असावी नायिका सुंदर
गळ्यांतून यावी तिच्या मालकंसाची तान
सावरीत यावे पदरांचे घुंगर
धरावा निर्भयपणे तिच्या हात हाती
नामर्द कशाला करीत असे
वावटळीत दिवा लावणाऱ्या त्या
चारूदत्तालांच वसंतसेना दिसे.

## माहेर

पलीकडें त्या नदी किनारी देवीचे मंदिर
लहान घरकुल तिथेच आहे माझे माहेर
लाख फुलांनी पहा लकडला पारिजात इवला
त्याहून सुन्दर सोनफुलांनी चंपकतरू फुलला
नयन मनोहर गुलबक्षीची फुले उमलती रोज
तिथें बसूनी भाऊ माझा वाजवितो अलगुज
काजळ नयनी तीट कपाळी जावळ ते काळे
ओटीवरती पहा लाडका चिमणा भाचा खेळे
दाट सड्यावर घालिती सुन्दर वहिनी रांगोळी
इकडे केळी जवळी करती सगळे आंघोळी
फुटे तांबडे जशी उलावी पिकली डाळिंबी
अशा पहाटे आई पूजिते माता जगदंबे
हवा मोकळी नीटनेटके सारविलेलें घर
मने मोकळी सुख ते सकला छोटा संसार
अशा सुखाना सोडून आले मी सरिता तू सागर
या प्रेमकरांनी घाल आता रे मायेची पाखर

## फारच नाजूक

फारच नाजूक तुझे बोलणे नाजूक ओठावरती थांबते
परिजातका नाजूक फुलणे मृणाल देठावरती शोभते
नाजूक काया मुख ते कोमल नाजूक नयनांची ती कमले
भाव फुलांची जोडी स्नेहल प्रीती सुगंधासवेची उमले
अनुरागाने तुझीया सदनी चोर पाऊली राया आला
नील नभासम निळसर नयनी राग प्रीतीची तांबुस खुलला
नाजूक शय्या मंचक नाजूक नाजूक खोली रंगही नाजूक

नाजूक इवला दिवा तेवतो नाजूक त्याचा प्रकाश हसतो
वेळही नाजूक प्रश्नही नाजूक कोमलतेहुनी अगदी नाजूक
हृदयांजवळी घेशील का ? त्याहुनी नाजूक होशील का?
घेईन हृदयाजवळी तूते परंतु नाजूक पडले कोडे
सांगा याने होईल का संतती नियमन गडें !
फारच नाजूक या प्रश्नाने नाजूक झाली अशी अवस्था
काय करावे मला कळेना मी तर झालो पूर्ण निरूत्तर
काय कसे तेमला न कळले मिठीत दोघे विरघळलो
अजून दरवळ भरून राही घमघमले प्रीतीचे अत्तर

## गाढव आणि उंट

आपण घ्यावे आपणावरूनी
ओवाळून ते दिवे
बळेच गावे पवाड अपुले
दुजा ऐकवावे

नसो नसू द्या त्यात कल्पना
तुमच्या कार्याची
तोही उधळीत फुले तुम्हावर
फुले गौरवाची

कुणा कवीने म्हटले आहे
गाढव भेटे उंटाला
परस्परांच्या रुप गळ्याची
स्तुती करण्याला

## कपात

सूट कडक ना दिले
पण हलका पायझमा
बूट नाही ते कसे
पण चपला पायझमा
केस वाढले अनाथ
नाही कसे कापले
आणि काही साथ साथ
दाढी पण वाढतसे
नको करू संकोच
घे चहा या कपात
तरी मला कळलेच
तुझी झालीसे कपात

## शुक्रस्मिता

तृणाकुरांची नवनव मखमल
नील नभांतील सायंतारा
सहवासाने सखे तुझ्या ग
मनांत त्यांना मिळे आसरा
तृण कोमल स्पर्श मऊ
शुक्राची मोहकता
एकवटे तुजपाशी
म्हणुनी तृणशय्येवरी
ये सखये शुक्रस्मिता

## ऑफिस

सरली गडबड
फुंकत बसले प्यून
जिपा पळाल्या
आवारातल्या
धूळ जरा उडवून

टेबलावरती
कुठे चहाची किटली
कुणी फोडली झक्क सुपारी
कडक तंबाखू चुरली
रिते हळूहळू

ऑफिस झाले आता
बसला रेलून
टपाल कारकून
पत्ते लिहिता लिहिता

## खिडकी

खिडकीतून दिसणारा एक नभाचा तुकडा
डोकाऊन बघणारी एक वेल फुलवाली
एवढीच मज पुरतें सोबत जीवनात यावेळी

तेही सुख नाहि मला अंध नजर झाली
मिटलेल्या डोळयांनी
पाहण्यास मी शिकलो

बीजातील लपलेला
वृक्ष पहाया शिकलो

## प्रिय भारत

गंगा नदीची सिंधू नदीची
आम्हा प्रिय भारतभूमी ऋषीची

तिन्ही बाजूनी गाज ही सागराची
वरी उत्तरी रांग ही पर्वतांची

रचिली निसर्गे सिमा जियेची
आम्हा प्रिय भारत भूमी ऋषीची

मळे केसरी काश्मिरो गंधताती
बने चंदनी केरळी धुंदताती

फुलांची फळांची दुधाची मधाची
आम्हा प्रिय भारत भूमी ऋषींची

इथे नांदतीं भिन्न भाषा नि बोलीं
इथे भिन्न ते धर्म अन् भिन्न चालीं

जरीं भिन्न सारे तरीं उन्नतींचीं
आम्हा प्रिय भारत भूमीं ऋषींचीं

जुनीं संस्कृतीं आमुचीं पूर्वापार
नवे सर्वहीं पचवूनीं हो सुधार

नव्या चांगल्याच्या सदा स्वागताची
आम्हा प्रिय भारत भूमीं ऋषींचीं

## तूच कसा

भुरभुरत्या वेंलीवर
हूरहूरती रानफुले
थरथरत्या प्रीतीवर
जीवन सुम बघ फुलले
अलगद पाखरू बसले
धुंद प्रीत पण लुटतें
तूच कसा होशी उभा
तुडवाया हें फुल

## कांप्यूटरला विचारा

रोज भडकणारे भाव
सतत वाढणारी बेकारी
जाळपोळ दंगे धोपे
वाढले व्यसनी जुगारी

अमानुष बलात्कार
किळसवाणा भ्रष्टाचार
कधी संपणार हे सारं
कांप्यूटरला विचारा

तो काय सांगणार
त्याला फीड करणारे
आहोत ना आम्ही
मानव नावाचे
अमानवी प्राणी

## निर्माल

भूकंपाचा वारा
तळातून फांज्या
कापर भरल्या सारखी
घराची पान थरथरतात
पानाआड लपलेली
निष्पाप फुलं
उघडी पडतात
बेशुध्द होतात
गुदमरतात नि होतात
निर्माल्या
नाहीतरी शेवटी
फुंलाच्या नशीबी काय
निर्माल्यच

## धर्म

रस्त्यावरुन जातांना
बलिष्ठस् शरणस् गच्छामि
ऑफिस मधे असताना
वरिष्ठस शरणम् गच्छामि
आपल्या घरी असताना
कलत्रम् शरणस् गच्छामि
हाच आजचा धर्म काय ?
धर्मम् शरणम् गच्छामि

## पहा जमलं तर

काळोखाच्या कपारींतून
प्रकाशाच्या धागा विणणारी उषा
तिची एकदा घ्या नजरभेट
तुम्हालाहीं विणता येईल धागे
प्रयत्नाचे प्रेमाचे स्नेहाचें यशाचे पण
पहा जमल तर

वेलीच्या बटा कुरवाळूनही
किरणाचीं नाजूक बोटे
एकदा हातात देऊन तर पहा
तुम्हालाही हाताळता येतील नाजुकपणे
तुमचे प्रश्न तुमच्या समस्या
तुमचे नाजूक हितसंबंध
पहा जमलं तर

गडद अंधारात झाडावर
नयनरम्य रोषनाई करणारें काजवे
त्यांची सहज घ्या मुलाखत एका रात्री
तुम्हालाही सहज घ्या जमेल दाखविणे
तुमचे अस्तीत्व सुप्त चैतन्य प्रकाश
पहा जमलं तर

उदयोगाचे प्रकल्प जागोजाग उभारणाऱ्या
मुंगावरती त्याच्या लेण्यात
त्या वारुळात सहज टाका नजर
तुमच्या मनावर सहजपणे ठसलीस
काही महत्वाचे मुद्दे ...
शिस्त संघटना चिकाटी व श्रम
पहा जमलं तर

असं काही जमायला
रोजची यांत्रिकता ठेवा बाजूस
मुक्तपणे हिंडा पहा बारकाईने
सारा आनंद दायी निसर्ग
साऱ्या विश्वाचा आद्य परिपुर्ण शिक्षक
पहा जमलं तर

## नको तर नको

नको तर नको
मला तरी त्याचे काम
तुलाच हवी असते
चहात दुधावरली ती साय

नको तर नको
मला तरी कुठे आहे वेळ
तुलाच हवा असतो
नवा पिक्चर पहिला खेळ

नको तर नको
मला नकोच घालू भिती
दुसरे पण मजवरती
करतात बरं प्रिती

## सुखाचे माप

डोळयात भरे ये वयात आलीस भोळी
अंगात दाटते तंग तुझ्या काचोळी

नजरेत निराळी नवी नाटकी नीळ
गालात गुलाबी खुले सावळा तीळ

चालीत चोरल्या चूर पैंजणे पायी
हास्यांत युगाचें हास्य लयाला नेई

ये अशी उशाला रूकार नुसता नको
या भुक्या जिवाला सुवास नुसता नको
मस्तीत होऊ दे सुरत सुखाचे माप
अन् जगांस म्हणू दे खुशाल याला पाप

## स्पर्श

स्टेशनच्या बाजूस मी
होतीस तू शेजारी
चुकून कधी नव पडली
गाठ अशी सुखकारी
पण गाठीत आज कशी
गा'ठुन तुज नाजुकशी
कोपरखळी सहजपणे
सुखकर हा स्पर्श पहा

## स्विकार

नितळ त्वचा तलम वतन
कुरळ केश चंद्रवदन
सडपातळ हिमगौरी
उन्नत भूज का संघन
लोचनात आवाहन
अधरांवर आमंत्रण
कामाचे क्रोधाचे
मोहाचे नाशाचे
केला परी स्वीकार

## ज्ञान हवे

मांडीवर निजलो पण
झोपेवीण रात सरे
सरल्यावर कळले की
आईच ती ना दुसरे
जर आधी हे कळते
दुःखाचे क्षण टळते
यासाठी ज्ञान हवे
कोठे मी कोठे मी !

## पानझडी

केस सारे पिकले बोळके ते झाले
गळले अवसान झाले पिकले पान
पाखरु आलं गावात असच एक मारु
नाचण्या गाण्यांत न दे त हात धरु

बघावयास गेले डोलवली मान
गालांमधें हंसले कुटत पिकले पान
पिकले पान हिरवा देठ अजून आहे
पानझडी वाऱ्याचीच फक्त वाट आहे.

## चेहरा तुझा

गोकर्णिच्या फुलांसारखा
चेहरा तुझा उमललेला
निळ्यामधे पांढरा कसा
बेमालूम मिसळलेला

निळा नक्की कुठे संपतो
पांढरा कुठून सुरु होतो
हेच मुळी कळत नाही
जसा तुझा राग नि प्रेम

## पहिल्या भेटितील

चंचल मन चुळबुळते
खळबळते हृदयांत
तुजपाशी तेच सखे
मग का या स्पंदनात

शब्द एक मी जपतो
वरचेंवर आठवितो
गोड शब्द मस्त रूप
भेटीतील त्या पहिल्या

## वसंत पंचमी

तारुण्याने मुसमुलेल्या उमलती मुग्ध कळचा
धुंदफुद होऊनी नाचती. आज इथे सगळ्या.
मदन मत मधु मादक त्यातिल युक्ती एक समोर
मदन उत्सवामध्ये नाचते, जणु मेनकाच मनचोर

कच्छ साडी नयनमनोहर कविवरती मेखला
काजळ नयनी. केसामधूनी फुल तुरा माळला
भरलेल्या अंगात वाढली चोळी किनखापाची
भाळावर शोभते रेंखली चिरी कुंकवाची

मदनचाप करी पहा असोढते प्रत्यंचा हळूवार
अन् कसा फेकितो पहा मदनिका नाजूक शरसंभार
ही वसंतातली नवरंगाचो रम्य पंचमी आहे
ही मसुमुसलेल्या तारुण्याची भव्य सजावट आले

नृत्यांत जाहले अंग अंगहे चिंबचिंब बेहोश
रसिकांचा गेला बघता बघताच सर्व तो होश
जणु इंद्राच्या सभेत नाचे रंभा अप्सरा कोणी
कुणा खांची उषा नाचते प्रकाश वेडी राणी

वसंतातल्या रम्य पंचमी धुदं धुदं हा आनंद
पूर्वज आपुले करित साजरी होऊनी बेबंद
उरल्या नुसत्या प्रणंय कल्पना त्यातिल कांही काही
त्यातही आता समजावायला काही साधन नाही

बंद घरांतुन टी. व्ही. वरती आगही पाहातो नृत्य
चैतन्याचा पत्ता नाही गेले हरवूनी सत्य

पुनवेच्या चांदण्यात आम्ही नृत्य कधीच करणार
युवायुवतिचे स्वप्न कधीचे साकारूण येणार
मुक्त मनाने आम्ही आमुचा लुटणार कधी अनंद
गुदरमरलेले जिणे आमुचें होणार कधी बेबंद

## रायेंच्या पायांत पैजणें

असे खळाळून तू हसल्यावर
फुले कळयांची आली उमलून
तांबूस झाले गोल दिशांचे
पैसा प्रीत तुझी अजमावुन

परम सुखाची लाट पसरली
सुगंध घेऊन वाऱ्यावरती
वाऱ्याचाच मनातील हेतू
थेंब दवाचे पण विरती

थेंबावर किरणांच्या धारा
हलक्या होते तेज शिपती
तेज लिपता थेंबावरती
थेंब त्या होती मोती

कंठाच्या घरटयातून धावें
स्वरपक्षी गगनात स्वैरता
राधेच्या पायांत पैजणे
बांधी निर्झर हंसुन गोडसा

मराठी ग्रंथ संग्रहालय ... काव्य

## महिना असे हा फुलांचा

पळत्या नभाचा, ओल्या उन्हाचा
महिना असे हा फुलांचा– हिरव्या नि हंसऱ्या तुणांचा
पिवळ्या उन्हाचे रेशीम प्यावे
मखमाली हिरव्या हलके बसावे
नभ न्याहळावे

चंबल सरीचा मिश्किल उन्हाचा महिना असे हा फुलांचा
इंद्रधनुष्य खुलती नभावर
ओलेती न्हावा धरती खरोखर
होतें अनावर

नागोबा देवाचा मंगळा गौरीचा महिना असे हा फुलांचा
जागोजाग तुणते उगवून आले
आंसाड सारे शोभून हंसले
आनंदी झाले

उडते पंतग अन् चढत्या झुल्याचा महिना असे हा फुलांचा
तृप्त ही धरती पाणी पिऊनी
उन पावसाची खेळी बघोनी
मिश्किल हंसोनी

उत्साही आनंदी वातावरणांचा महिना असे हा फुलांचा
भिरभिर वाऱ्यात उडवा पतंग
पावसात भिजण्याचा न्याराच रंग
होताल दंग

सृष्टीदेवीची राजा हृदयाचा महिनाच असे हा फुलांचा
झिम्मा फुगडी झोके उखाणे
गाणे जगणे कपडे मिरविणे
हंसणे खिदळणे

सुखसोहळयाचा नारही पुनवेचा महिना असे हा फुलांचा
पळत्या नभाचा ओल्या नभाचा
महिना असे हा फुलांचा हिरव्या नि हंसऱ्या तृणाचा

## गप्पा

जुळत्या आवडत्या ओघवत्या ,
क्षण क्षण रंजवित्या रमल्या गप्पा...
एकाकी भावाला गात गुणवित्या
मधुर स्वप्ने रंगवित्या ,
लटपट लयीस आपुल्या–
उदासतेला लवमात्रे लोळवित्या गप्पा

घोळा डवलयित्या , कंटाळा घालवित्या
जीवन जागर जागवित्या ,
जागत जागत संपत सरता
सवेध झोपविल्या गप्पा

गप्पांतुन ये प्रतिमे
उधळांत भाव फुले ,
पूजित अतिम प्रेमे
काव्यांतिल नव उन्मेषा–
नादत पेजणि मादमथुरतेचा
किणकिणत्या......

## रडतो

अफाट गवतात
चरणारी फिरणारी
उन्हा पावसात
तापणारी भिजणारी गुरं

कुणाला दिसतात
त्यांच्या मूक यातना
नाना वेदना संवेदना
त्या फक्त एका

ईश्वरालाच ठावें
अम्ही मात्र आपलेच
दुःख सदा रडतो
त्या देवापाशी

## बेंकारी

आसमंत चांदरात
रेशिम रेती वरती
करांत कर घालूनी
प्रणय गीत घोळती

गीत कसले असले
कोणीही नव हंसले
कुजबुजले पण
नाईलाज ही बेकारी

## प्रश्न

प्रीत तुझी मजवती
कधि जडली कां जडली
तो न पडे प्रश्न मला
परदेशी कुणी मुग्धा
तुजवरती हां लुब्धा
त्यावेळी सांग सख्या
तूं मजला स्मरशिल कां ?

## बघता बघता

कालच आलीस
आणि आजला
कळला तुजला
माझा मानस

विसरून गेलीस
बघता बघता
प्रेम निरागस
तुंजवर असता

कारण चुकवून
मजला आलीस
दुजास घेऊन
पिक्चर पाहून

## फायलीच्या जगात

फायलीच्या जगांत
सारे काही फाईल होते
मंत्र्याचे अपराध
उपमंत्र्याचे प्रमाद
साहेबांच्या चुका
पुढाऱ्यांच्या घोडचुका
न्यायधीशांच्या गलती
कारण ते सारे नशिबवान
म्हणून त्यांची चालते चलती
पण हे सारे कागद......
व्यस्थितपणे फाईल करणाऱ्या
कमनशिबी कारकूनाची मात्र
टाचणी एवढी साधी चूक
वरिष्ठाच्या जळजळीत नजरेसह
एक कडक मेमोला प्रसवते,
अन् मगच होते फाईल
असं बोलले जातं की,
त्याच्या फाईलीत साऱ्याच गुन्हांची
नोंद केलेली असते बिनचुक
तिथले कागद विनाचौकशी
फाइल हो असावेंत इथल्यासारखे
फायलीच्या जगात हे असेच घालावयाचे
म्हणून काय हाल त्याला कुणीतरी
एकदा फायलावर घ्यायला हंव
नाही का ?

## प्राजक्त

लक्षलक्ष इवलाल्या लोभस
मृदुल फुलानी हलवला
लाजून लवलेल्या ललनेचा
भाव फुलोरा हा फुलला
मदन मस्त मधुमादक पहिल्या
मीलनातल्या गोड कळा
अथवा मानस सरोवरातिल
हंसाचा हा मुक्तीमळा
किंवा हे बहुमोल प्रदर्शन
मदनाच्या शरचायाचे
अथवा मानवतेचे अश्रू
मोती झाले त्यांचे
स्वर्गातील मेनका मनोहर
विश्वामित्रावर भुलली
स्वर्गधरेच्या त्या प्रेमाची
'मारक पुष्पे ही फुलली
राजपुतानी लावण्याचा
होम लाहला अनीवर
पवित्र सूंदरता ती नटली
नसे फुलांचा संभार
सकाळ संध्याकाळ घालसी
सडा फुलांचा भुवरती
अपऱ्या आशा आमुच्या तेथे
खरच सांग ना बागडती

## भीतीचा गोळा

पुढ्यात होती फाईल आणि ओ. सी.
सांगू गेला दहा प्रती करा
नकटा कोणी सी. सी.
बसले मी मग टंकलेखना
पण लागेना अक्षर
म्हणून उठले लगबग जाता
ढळला थोडा माझा पदर
सी. सी. पाशी सहज उभी मी असतां
नकळत झाले गोरी मोरी
नजरा मेल्या वळल्या सगळ्या
बघायची पण चोरी
त्या नकट्याने चक्क मारला
हळुच ग मला डोळा !
प्रथम असला प्रसंग मजवर
भीतीचा उठला गोळा

## आंगठा

ठेकुण मारी तोच आंगठा
टिळा लावितो तोच आंगठा
सरकवि पत्ते तोच आंगठा
बटन दाबतो तोच आंगठा
बदलत नाही कधीच नाही
परंतु बदले एक नेहमी
तुमच्या माझ्या
चप्पलाचा

## हिंसाचार

थांबेल कसा हा हिंसाचार
थैमान घालतो आहे राक्षस
नसे त्यास अटकाव कुठेही
साऱ्या देशामधे घालतो
सदैव धुडगुस उसळत राही
मृत्यूस बोलवी वारंवार
थांबेल कसा हा हिंसाचार

त्वरा करा अन् करा एकजूट
उभे रहा धैर्याने सारे
निर्भय इतुके लागे व्हावे
जरी नभांतिल तुटतील तारें
न ढळे निश्चय अपरंपरा
थांबेल कसा हा हिंसाचार

उभविले कोटिच्या कष्टाने
पिढ्या पिढ्यांची ही धनदौलत
किती पुरातन कलासंस्कृती
राख कराया डोळ्यादेखत
हिंसा राक्षस करी संचार
थांबेल कसा हा हिंसाचार

## कोरी

नव्या साडिच्या घडीपरी तू कोरी
फटीतूनीं ही तुझ्याकडे पाहावयाची चोरी
बंडखोर डोळ्यानीं मोडुन ती चाकोरी
टक लावून ग तुला पाहिलें अशी पाठमोरीं

नितळ पन्हाळीं पाठ तुझी ग गोरी
केस मोकळे रुळतीं तीवर रेशिम लडीपरीं
कधी पाहाशिल वळून मागे सहज
न्याहाळीन मी तुझ्या चेंहरा सौंदर्यांचा साज

लक्ष वेधण्याग तुझे मी वाजविला अलगूज
पाहिलेस तूं चमकून मागे हसली गालीं लाज
मी गेलो मोहून प्रिये तुला पाहांता
ताजे पण त्या दवबिंदूचे उमलत असतां
नयन बोलके नवथर प्रीत बरसात

नयनबाण फेकताच माझी शुध्द गेली असता
शब्फुटेना गळ्यातुनीं या अजब तुझी किमया
घायाळ होऊनी गेलो घालवित सुंदर क्षण वाया
काय करावे मला सुचेना– क्षण ते झाले अत्तर फाया
धडक कृतीविणं ओंजळीतले सूंदर क्षण लागलें तुटाय

## अन् पुढचे

तव नलिनी सम कोमल
हंसशी हळुं मखमांली
मितभाषी लाजतसे
बघता मज वरखाली
ऊर तुझे धडधडते
करय सखे अवघडते
स्वाधिन हो तू माझ्या
अन् पुढचें मी बघतो

## लेंणे

प्रसन्न झाल्या दिशानिवळुनी सरता पाऊसकाळ
पिठासारखे पडे चांदणे सुन्दर रानोमाळ

तुझहि गेला आहे सख्ये माझ्यावरला राग
तुझ्या स्मिताच्या चांदण्यात मी घेई सुखाचा माग

मला न कळले तुला नाकळे गगन कसें हे निळे
सरोवराच्या निळ्या जळावर निळी निळी कमळे

हे निळे निळेपण तशी प्रीती तव अबोध सुन्दर
अनुपम आहे त्या प्रीतीचें आपले मंदिर

सदा असावे यां संसारी शरदाचे चांदणे
स्पर्शाने तव संसाराचे व्हावे सुन्दर लेंणे

## मानवता

लालसख्या नयनांतून
हंवऱ्या सम नजर फिरे
आचरण्या नित्य पाप
सरसावुनी उभय करे
रोम रोम फुलत स्वार्थ
अणुरथांत बसुन पार्थ
तोंडाने घोष मात्र
मानवता मानवता

## विजयांच्या वेशीवर

वाटेतिल काटयांनी
अडवियली वाट आता
त्यातुनही जा पुढती
फुल तुझ्या ये हाता
येईल तव हाति फुल
पडिल तुज गोड भुल
विसरशील सर्व कष्ठ
विजयाच्या वेशीवर

## लुटावयाला

अंगकांति तंव मुलामय
रेशिम कोमल त्वचा झिरझिरी
बघतां बघतां पडे चांदणे
मनात येते गोड शिशिरी

मोहक तूं तर रजत पटांवर
घरी पाहतां त्याहुन सुंदर
असीम सौंदर्याचा ठेवा
देशिल कां मज लुटावयाला

## जेलर

अंगार फुले नजरेतुन
श्वासातुन गरम झळा
कासाविस सकलांची
वाराही पडत लुळा

सृष्टीचा तूं जेलर
बाहेरून तूं कठोर
अंतरांत करुणाजल
साठवले ग्रीष्माने

## मनगटात

दाखवितां हात कुणा
काय असे नशिबात
तोही पण सांगतसे
धन लाभे नोकरीत

स्वस्थ काय बसलास
फी देऊन फसलास
हात कशाला बघतो
बघ खाली मनगटांत

## चंद्रवंदन शारदा

नील नील गगनाला
चुंबतात तुंग गिरी
वनराजी हांसतसे
कमल फुले कासारीं
वीणा ती दक्षिण करि
वाम करी ग्रथ धरी
कमलासीनं स्मित करिते
चंद्रवदन शारदा

## स्वर्ग

मेरुवर स्वर्ग असे
पोथी कुणि वाचली
मेरु तर सोन्याचा
गोष्ट खरी सांगितली
जर तुम्हांस स्वर्ग हवा
नित्य नवा भोग हवा
तर मिळवा यत्नाने
सोने पण पैसा पण

## छे आना

कडकडीत युवक दोन
खुर्चीवर कडमडले
पाण्यात ग्लास दोन
पोऱ्याने सरकविले
जवळ नसे [गिन्नीपण
तासानी दोघे जण
जाता।ना हो पुकार
" ग्लास फोडा छे आना "

# नकादुचेण्यापकासके

जिथे गिऱ्हाइक सदैव जाते
आणी येते सुन्दर होऊनी
वितळून जाता अमंगलाचे
चेहेऱ्यांवरचे दाट धुके
नकादुचेण्यापकांसके
जोवरि तेथे लक्ष वेधते
सुभाषितांचे फलक शोभती
चित्रतारका समोर दिसती
मधूर बोलिचे झरे वाहती
गप्पांच्या हळुवार पाकळ्या
ठायी ठायी विखरूनी जाती
या साऱ्या फसव्या फसव्या
धुक्यात त्यांच्या अंर्तमनिची
सदेव दुःखे लपुनी बसती
दिसतीन कोणा त्या हृदयीच्या
व्यथा वेदना नित दबलेल्या
तोवरी न तिथे गिऱ्हाइकांची
वाण तुम्हाला दिसू शके
नकादुचेण्यापकासके
असेच आपुले दुःख उरीचे
साज सजावट झक्क मांडणी
अवीट गप्पा मधुरिम वाणी

या सान्यातून तयार करतो
लक्षवेधी धुक्याचा पडदा
त्यामागे लपवून टाकती
आनंदाने निजकर्तव्या जागें असती
तर पडेल का सांगा – वाणतुम्हा
या दूनियेत कशाची !
लक्ष्मीचेही मस्तक तुमच्या
चरणावरती सहज झुके
नकादुचेण्यापकासके
उलट वाचता अर्थ जयाचा
सहज तुम्हाला समजू शकुं
नकादुचेण्यापकासके

## गोड आठवण

रात्र सरताना
म्हणाली रसिका
तादातूट झालीं
आपली बरं का
प्राचीचे हे फुल
भेट अनमोल
दिली माझी पहा
गोड आठवण

## भलरी घाल रे

ये रे ये रे ये भलरी घाल रे
औंदा मोत्याची पिकली रासरे
काळ्या आईचे देणे अपार रे
किती घेशील दोन्ही हातानी रे
घाल तुझी भलरी घालरे
पहा फाल्गुन निळ्या आकाशी
हांसे धान्याच्या खाली या राशी
सारे सारे असा मज पाशी
नाहि ठेवणार कुणा उपवासी
अशी सोन्याची सुगी चार घोड्यांची बगी
धरा घोड्यांच्या टापावर ताल रे
मी मी म्हणता हे संपेल काम रे
यें रे ये रे यें –

कारभारणी तुझा झोक न्यारा
हळदीवाणी तुझा रंग गोरा
तुझा मुखडा मला फार प्यारा
नजरेत परी तुझ्या निखारा
नाचे सुख तुझ्या डोळ्यातून डोळ्यातून
आले थेंब सुखाचे त्यातून
का ग बसलीस खातून नको जाऊ रूसून
फुटे ओठावर डाळिब लाजरे
मुख पुनवेंच्या चांदावाणी हासरे
यें रे ये रे यें –

## हे आकाशा

आकाशा आकाशा, अंतराळा अंतरिक्षा
तूं आहेस कसा ! हे कळावे ही अपेक्षा
तुझे गूढ उकलीत आहोत युगे युगे प्रतीक्षा
करीत आहोत काय करणार आम्ही यापेक्षा
तू अपार असीम अथांग अनंत
अफाट अमर्याद अतर्क्य अगणित
अजिंक्य अप्राप्य अजय अज्ञात
अमांप अनद्य अतृट अमीत
अलंघ्य अदृश्य अनंग अभावित
अपार्थिव अभंग अचिंत्य अपरिमित
अरूप अनाकार अभेद अलिप्त
अविंध अलभ्य अमर्त्य अतीत
अपूर्व अविभाज्य अजोड अनावृत
अनिबंध अनिवार अविचल अवेष्टित
अविनाशी अपश्य अगाध अनावगुण्ठित
अनपेक्ष अवध्य, अविच्छ अनागत
अखंड अनासक्त अलभ्य अघटित
अगोचर अवश अजब अदत्त
असंभव अलौकिक अतिशय अजात
अदूर अचल अगतिक अनाघ्रात
अनतिक्रम्य अनिवच अशब्द अभूत
अवेद्य अच्छेद अमल अद्भूत
अपरिहार्य अभोध अगम्य अनाश्रित
अदह्य अविद्राव्य अस्पर्श अनांकित
अतिरिक्त अवर्ण्य अबोध अबाधित

अगंध अजन्म अदम्य अचुंबित
अलोट अदेय अनिर्वेध अनवरत
अनिर्वच अबाध्य अरस अकुंठित
अवह असेच अशरीरी अनिकेत
असा जरी तूं तुझे अस्तित्व जाणण्या
तुला जिंकण्या आक्रमुनी तुज मुठीत घेण्या
आम्ही भारतिय सज्ज आहोत
अंतराळ वीरांची पथके तयार अमुची
झेप घ्यावया–उंच उंच उंच

## रिमझिम झरे धारा

रिमझिम झरे धार धरतीवरीं
श्रवणाना सुखवित ये श्रावणसरी
स्वर्ग ये भूवरी, रिमझिम झरे धारा
हिरव्या हिरव्या तृणाची पाती
मंद वाऱ्यावरी गीत गातीं
कधी विद्युत संचार, कधीं वारे अनिवार
कधीं झोंबतात अंगाला गार लहरी
नभ मेघानी नटते नकळत
डोळा भरून पहावी ही दौलत
पाखरांचे थवे करितीं आकाश नवे
शिल्प सौख्याचे कोरतीं हृदयावरी
ओला ओला हा हिरवा श्रावण
उन्हा पावसाची मोहक भुलावण
झोके उंचावरी पतंग नभावरी
सृष्टी जाते बनून एक नवी नवरी

## हिरवा श्रावण

हिरवा श्रावण आनंदीं
पान फुलावर ये धुन्दी
भिजताना पावसात
येते मजा अशी येते मजा
शाळेला महिनाभर
द्यावी रजा वाटे द्यावीं रजा
चमचम करितात
दूर दूर विजा हो दूर दूर विजा
व्हावे वाटे स्वच्छंदी
पान फुलांवर ये धुन्दी
येते सरीवर
सरती पुन्हा हो सरती पुन्हा
पडते क्षणात ऊन
जाते पुन्हा पहा जाते पुन्हा
दोघांना करमत नाही
दोघांविना हो दोघांविना
लाल उमलते जास्वंदी
पानफुलावर ये धुंदीं

## ये श्रावण

मळलेली पाय वाट
तू येता हिरवळली
सुकलेलीं फळबाग
तू येता दरवळली
फुलपाखरे उडती थवे
इंद्रधनू स्मित नटवे
सृष्टीचे स्मित उधळीत
ये श्रावणा ये श्रावणा

# दुपार

नितळ निवळ गगन निळें
कापरापरीस दुपार जळे
पान कळी फूल पाकळी
हातात हात गुंफून साखळी
श्वास रोखला त्यानी बळें
कापरापरीस दुपार जळे
रस्ते वाटा वळणे शांत
नदी ओढे नाले निवांत
खळखळ कुठल्या कुठे पळे
कांपरापरीस दुपार जळे
सारेच तंद्रीत जडावलेले
अवखळ वारे हरवलेले
तटस्थ तृप्त दृश्य सगळे
कापरापरीस दुपार जळे
साऱ्यांना खिळवून जागच्या जागी
विराट पुरुष बनतो योगी
तेव्हा अलौकिक प्रार्थना जुळे
कापरापरीस दुपार जळे
गाभाऱ्यात निळ्या नभाचा
उजळल्या वाती मौनाच्या
प्रसन्न दाही दिशा त्यामुळे
कापरापरीस दुपार जळे
भारावलेल्या माझे तेव्हा
नम्रपणे हात जुळतात
आपोआप अहंकार गळे
कापरापरीस दुपार जळे

## सुखी संसारपारूचा

मला वाटलंनव्हतं असा
पिऊन येशील रात्रीचा
तुझ्यासाठीच किती वेळा
केला दिवस रात्रीचा

मला वाटलं नव्हतं असा
पैसा सारा घालवशील
अंगावरच्या कपड्याला पण
एक दिवस महागशील

मला वाटलं नव्हतं असा
माझा देव दैत्य निघेल
प्रकाशाला अंधाराचे
काळे काळे पान फुटेल

मला वाटलं नव्हतं असा
व्यसनी माझा पती आहे
ज्याच्यासाठी मला सारे
वेंचायाचें व्यसन आहे

वाटलं नव्हतं तेच माझ्या
नशिबाला आले
चंद्राच्या या चांदणीला
डांबराचे तेज आले

आता रडुन उपयोग काय ?
आता कशाला डोळे ओले ?
उखळात डोके घातलेच आहे
मुसळाचे घाव सोसणे आले

देवा आता तूंच याचा
नाद सोडव दारूचा
आणी कर एकदा तरी
सुखी संसार पारूचा

## शिल्पी सृष्टीचे सारे

मेघ झाकती नभाला झडे श्रावणाची सर
वारा झोंबे झांदयांना येते उन्हाळा लहर
कधी सरीवर सरी कधी उन्हावरी उन्ह
बोले तृणासवे वारा तृण डोलते हंसून
फुले हासती गाली डोळे मारती विजा
छत्र्या घेऊनी हाती लोक करीती येजा
साऱ्या शिवारास आहे काळ्या नभाचे आव्हान
तृप्त पाणी पिऊनिया पाणी माती झाली हो मस्तान
ओला हिरवा श्रावण झाला राम धनूंधारी
दुष्ट दुष्काळ रावणा एका बाणाने मारी
पानफुले तृणपक्षी करी जयजयकार त्याचा
धरतीचे आम्ही पुत्र आमुची कां गेली वाचा !
जरा बाहेर यारे यारे खुल्या अंगणात
व्हा सामील आनंदे अशा उन पाऊसात
एका थेंबामधे आहे शक्ती सृजनाची सारी
एका किरणात वाहे गंगा तेजाची न्यारी
पहा एकवार तरी हा सुखाचा सोहळा
शिल्पी सृष्टीचे सारे इथे झालेत गोळा

## आता उगी राहवेना

आता उगी राहवेना !
चार भिंतीतले जग
त्याचा आलाय उबग

रोजचीच सारी येजा
आज डोळा पाहवेना

आता उगी राहवेना !
घट संध्येचें ते रिते
रंग क्षितीज पितें

रंग येथील विटले
लास्य त्यांत जाणवेना

आता उगी राहवेना !
धुवाधार पावसांत
झाडे उभी भिजतात

चार तांब्यांत आंघोळ
प्रसन्नता पालवेना

आता उगी राहवेना !
आता उनाडले मन
कैद्यांपरी पिसाळून

गज तोडल्या वाचून
त्याला बरेंच वाटेना
आता उगी राहवेना !

## एक चुंबन गाभुळलेले

अंधार मिश्रित प्रकाश
प्रकाश मिश्रित अंधार
गळक्या नभाचा तशात
सुरेल सुंदर गंधार

पहिल्या स्पर्शासारखेच
काटा फोडणारे वारे
अवकाशातील विजेचे
तुझ्या नजरे परी इशारे

ओलतीने निथळणाऱ्या
तुझ्या सौंदर्याची खुबी
पाण्याच्या दर्पणात
लाजून लवलेली छबी

अशी सादळलेली हवा
ढग जरा रेंगाळलेले
तुझ्या मधाळ ओठावर
एक चुंबन गाभुळलेले–

## खोलांत

खोलीत माझा
उभा जन्म गेला
खोलात कधी मी
गेलोच नाही
तेव्हाच कदाचित
गेलो मी असतो
पण गालांत कधी तीं
हंसलीच नाही

## झोपू नकोस !

मिठीत धुन्द होईन कशी
घरांत मीठ सुध्दा नाही !
डोळयांत झिंग आणू कुठून
घरांत पीठ सुध्दा नाही !

श्वासांत कुठून ये सुगंध
गंधाची बाटली सुध्दा नाही
कुठले आणू गाली हांसू
आंसू सुध्दा डोळयांत नाही !

अठराविश्वें दारिद्रयाला
माझीच बरी दया आली
तुझ्या मात्र पुरुषार्थाला
अजून नाही जाग आली

अजून माझ्या हृदयांत आहे
तुझ्यासाठी जागा
तूं मात्र कृपा करून
झोपू नकोस ! हो जागा

## आठवण कर एकदा तरी !

इतकी राब राबतें आहे
सख्या तुझ्या संसारात
घेतलीस कधी चांगली साडी ?
नेलेस कधी बाजारात ?

हरवून जातोस म्हणे तूं
मित्रांघरी गप्पा मारत
मी आपली बसते इथे
उष्टी काढत केर काढत

डॉक्टर आहेस किती जणींचे
हातात हात धरले असशील !
छातीवरती हात ठेवून
ठोके सुध्दा मोजले असशील

कधी माझ्या हृदयामधे
पाहिले आहेस डोकाऊन ?
कधी माझ्या नाडीमधे
खेळला आहेस बाण होऊन

## जांभळांचे दिवस

पर्ण नभी मोगरिच्या ये चांदणे फुलांचे
धूंद मनी होतें येता दिवस जांभळाचे

पान पान भिजुनी चिंब निथळल्या तरुंची
रांग रांग रानामधल्या फुलाविना बुचाची

मूक विरहिं त्यांच्या रडते हृदय पावसाचे
धुन्द मनी होते येता दिवस जांभळाचे

मुक्त आसवाने उधळी सैरभर वारा
थिजुनि जाई माती मधला आर्त तप्त पारा

पूर्ण पिक्या लिंबोळीच्या मंद सुवासाचे
धुन्द मनी होते येता दिवस जांभळाचे

तुझे जांभळाचे डोळे जांभळीच साडी
जांभळीच्या झाडाखाली जांभळीच गोडी

जांभुळल्या ओठी अजुनी रंग जांभळाचे
धुन्द मनी होते येता दिवस जांभळाचे

पर्ण नभी मोगरिच्या ये चांदणे फुलांचे
धुन्द मनी होते येता दिवस जांभळाचे

## स्वागत

ज्योत विझे
विझताना
हो मोठी
मरताना
मानव पण
तेज कण
स्वागत करि
मृत्यूचे

## योगायोग

आज अचानक
सरिता भरली
पूर भराभर चढे
आणि म्हणाली
तुज आजवरी
दिली तरतरी
अता भयानक
विनाश होईल

## बाभळीचे बन

तीन पेडी दोन वेण्या एक पुढे एक मागे
उभार छाती वरती पुस्तक धरावे लागे

कुणी सुद्धा पाहू नये लपू पाहती असे
साऱ्या नजरा टाळून छातीवरले दोन ससे

साखरी जांभळा परीस गाभुळलेंले डोळे
बींज होऊन त्यातला पारा हवा तसा पळे

वेड लावील साऱ्यानां इतकी साडी सुंदर
पाय ठेवतांच वर्गांत सारे तासाला हाजर

तिच्या एका शब्दासाठी वाटे बोलावा नवस
तिच्या संगतीतले एक वर्ष मंतरलेला एक दिवस

कॉलेजची क्वींन अशी परक्याचे धन
वर्ग आंब्याच्या राईचा बने बाभळीचे बन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. २५८८
२५८२२
काव्य
२५४२८

स मा प्त

REFBK-0025822
REFBK-0025822

निरंजन प्रकाशन

के. जोशी अँण्ड कं.